कर्नाटक सरकार

# मराठी सरिता

## तृतीय भाषा पाठ्यपुस्तक

### इयत्ता 7 वी

# MARATHI SARITA

## Third Language Textbook

**Part - 2**

**7**

**Standard**

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)**
6th Cross, Malleshwaram
Bangalore - 560 003.

# अनुक्रमणिका


| अ.नं. | पाठाचे/कवितेचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 10. | रोबो (यंत्रमानव) | 1 |
| 11. | दिवाळीचा किल्ला (कविता) | 7 |
| 12. | आग्रा भेट व सुटका | 11 |
| 13. | शाळा (कविता) | 19 |
| 14. | मुंगी | 23 |
| 15. | सुधा मूर्ती | 30 |
| 16. | धरत्रीले दंडवत (कविता) | 34 |
| 17. | साप साप!! | 37 |
| 18. | म्हणींच्या गमती | 43 |
| | पूरक वाचन | 48 |
| | **तर मग गट्टी कोणाशी** | 48 |
| | **फुलपांखरू** | 49 |


@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ - 10

# रोबो (यंत्रमानव)



NOT TO BE REPUBLISHED

मॅडम : नमस्कार ! बालमित्रांनो.

विद्यार्थी : नमस्कार ! मॅडम.

मॅडम : मुलांनो, आज तुम्हाला माणसासारखेच पण न थकता काम करणारे यंत्र दाखविणार आहे.

स्मिता : बापरे ! माणसासारखेच यंत्र? बघायलाच हवे.

मोहन : खरंच, न थकता काम करणारे यंत्र? बघायलाच हवे मग. हो ना ग सुरभी?

मॅडम : हो हो ! सगळ्यांच्या शंका दूर होतील बरं का.

सुरभी : मॅडम, मॅडम ! कुठे आहे ते माणसासारखे यंत्र? आम्हाला लवकर दाखवा.

मॅडम : चला तर माझ्या सोबत मी तुम्हांला दाखविते. हा बघा यंत्रमानव किंवा रोबो. (सर्व मुले आश्चर्यचकित नजरेने पाहतात).

रचित : मॅडम, याला तर आपल्यासारखेच हात आणि पाय आहेत पण ते हलू शकतात का ?

मॅडम : हो तर, या रोबोचे फक्त हातच हलत नाहीत तर त्या हातांनी तो कामही करू शकतो व पायांनी चालूही शकतो.

स्मिता : मॅडम, हा यंत्रमानव काय काय कामे करतो ?

मॅडम : जी कामे आपण करू शकतो, ती सगळी कामे हा रोबो करू शकतो.

सुरभी : मॅडम, हा तर निर्जीव आहे. याला जीव नाही तर तो चालू कसा शकतो ? कामे कशी करू शकतो ?

मॅडम : मुलांनो, याआधी आपण संगणकाची माहिती बघितली आहेच. संगणक एक मशीन आहे. संगणकाद्वारे दिलेल्या प्रोग्रॅमच्या नियमानुसार हा काम करतो. रोबो हा मेकॅनिकल सॉफ्टवेअर व इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरिंगच्या मिश्रणाने तयार झालेले मशीन आहे.

रचित : मॅडम, हा रोबो बोलतो का ?

(मॅडम रोबोच्या पोटावर असलेले दुसरे बटण दाबतात. रोबो बोलू लागतो. सर्व मुले टाळ्या वाजवितात.)

सुरभी : मॅडम, या रोबोचा वापर आपण कोठे कोठे करू शकतो ?

मॅडम : सुरभी, खूप छान प्रश्न विचारलास. रोबो मोठमोठ्या कारखान्यातून काम करू शकतो, तसेच आपल्या स्वयंपाकघरामध्ये देखील काम करू शकतो. याचाच अर्थ छोट्या कामापासून ते मोठमोठ्या कामांपर्यंत सगळी कामे हा रोबो करू शकतो.

स्मिता : मॅडम, हा रोबो काय काय कामे करू शकतो हे समजले. फारच करामती आहे हा रोबो ! हा कोणी तयार केला ?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

मॅडम : हो, मी रोबोचा इतिहास तुम्हांला सांगते. वास्तविक सर्वात पहिला रोबो बनविण्याचे श्रेय 'स्पेरी जायरोस्कोप यांना दिले जाते. त्यांनी सन् 1913 मध्ये रोबो बनविला होता; परंतु 1932 मध्ये तो लंडनमधील रेडिओवरून लोकांसमोर आणला. त्यानंतर तो सर्वांच्या परिचयाचा झाला व लोकांना खूपच आवडला.

(मुलांनी आनंदाने टाळ्या वाजविल्या.)

## नवीन शब्दार्थ

रोबो = यंत्रमानव, निर्जीव = जीव नसलेला

मशीन = यंत्र, मेकॅनिक = तंत्रज्ञ, इंजिनिअर = अभियंता.

## अभ्यास

### अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) सर्व मुले आश्चर्यचकित का झाली ?
2) रोबो काय काय कामे करू शकतो ?
3) रोबो बनविण्याचे श्रेय कोणास जाते ?
4) सुरभीने कोणता पहिला प्रश्न विचारला ?
5) रोबो रेडिओवरून केव्हा लोकांसमोर आला ?

### आ) विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) निर्जीव ×
2) बाहेर ×
3) वर ×
4) सावध ×

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## इ) रिकाम्या जागा भरा.

1) माणसासारखे काम करणारे यंत्र म्हणजे ____________ होय.

2) _______ हा मेकॅनिकल सॉफ्टवेअर व इलेक्ट्रॉनिक्स मिश्रणाने तयार होतो.

3) रोबो ____________ व ____________ देखील काम करू शकतो.

4) सर्वात पहिला रोबो बनविण्याचे श्रेय ____________ यांना दिले जाते.

5) इ.स. _________ मध्ये रोबो लंडनमधील रेडिओवरून लोकांसमोर आला.

## ई) चूक की बरोबर ते लिहा.

1) ''बापरे ! माणसासारखेच यंत्र ?'' हे उद्गार स्मिताने काढले आहेत. ☐

2) ''हो हो ! सगळ्यांच्या शंका दूर होतील बरं का !'' असे मॅडम म्हणाल्या. ☐

3) रोबो आपल्या हातांनी काम करू शकत नाही. ☐

4) रोबो मोठमोठ्या कारखान्यात काम करू शकत नाही. ☐

5) जगातील पहिल्या रोबोचा जन्म 1913 मध्ये झाला. ☐

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम :**

✻ खाली दिलेल्या दोन चित्रांमधील फरक ओळखा.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

✻ खाली दिलेल्या यंत्रांची मराठी नावे लिहा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ✻ मोबाईल | = | ________ | ✻ कॅम्प्यूटर | = | ________ |
| ✻ वॉशिंग मशीन | = | ________ | ✻ फ्रीज | = | ________ |
| ✻ मोटरसायकल | = | ________ | ✻ फॅन | = | ________ |
| ✻ टी.व्ही. | = | ________ | ✻ रेडिओ | = | ________ |
| ✻ टेलिफोन | = | ________ | ✻ ए.सी. | = | ________ |

* तुम्हाला आवडणाऱ्या यंत्राचे चित्र काढा आणि रंगवा.

**विचारधन**

जिज्ञासा ही सर्व शोधांची जननी आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

## पाठ - 11

H8F4A5

# दिवाळीचा किल्ला

डोंगरावरचा किल्ला
स्वप्नात आला
म्हणे कसा मला
बांध अंगणात खुला.

मी तर घाबरलो
थरथर करू लागलो
किल्ला म्हणाला
घाबरतोस कशाला ?

युट्यूब दोस्त भला
मदतीला धावला
सोबत घेऊन त्याला
फेरफटका मारला

दगड विटा मातीला
आकार दिला
बघता बघता भला
किल्ला उभारला

सनई चौघड्याला
साज चढला
बुरुज माची तटाला
तोफेच्या धमाक्याला

सैनिक मावळे शूराला
वंदावे शिवबाला
एवढ्यात
आईचा आवाज आला

ऊठ बाळा चला
उटणे लावते तुला
आज अंगणात
आपण बांधूया किल्ला.

-मंदा नांदुरकर



NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**नवीन शब्दार्थ :**

अंगण = घरासमोरील मोकळी जागा

दोस्त = मित्र

सनई = मंगल प्रसंगी वाजविण्याचे फुंक वाद्य

माची = किल्ल्यावरील सपाट जागा

वंदन = नमस्कार

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) मुलगा स्वप्नातील किल्ला कोठे बांधणार आहे ?

2) किल्ला बनविताना किल्ल्याची माहिती कोठून मिळविणार आहे ?

3) किल्ला बनविताना कोणकोणते साहित्य वापरतात ?

4) कोणाला वंदावे असे म्हटले आहे ?

5) मुलग्याला स्वप्नातून कोणी जागे केले ?

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

### आ) पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

1) दुर्ग -

2) नदी -

3) दोस्त -

4) समुद्र-

5) डोंगर-

### इ) विरुद्धार्थी शब्द लिहा.

| | |
|---|---|
| 1) भले × | 2) दोस्त × |
| 3) दूर × | 4) चढणे × |
| 5) झोपणे × | 6) दिवस × |

## ई) खालील चौकोनात दडलेल्या किल्ल्यांची नावे शोधा व लिहा.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | ड | त | र | फ | न | लो | ह | ग | ड |
| क | य | स | ड | अ | आ | प | स | पु | न |
| ग | ड | ग | फ | प | र | त | व | रं | क |
| न | प | त | ड | न | ड | रा | छा | द | प्र |
| चि | त्र | दु | र्ग | प | ह | तो | न | र | ता |
| क | ख | उ | प | स | क्षा | तो | र | गा | प |
| ग | ड | म | फ | ह | रा | कि | री | णा | ग |
| रा | ज | ग | ड | क्ष | कि | सिं | तू | प | ड |
| तो | र्य | प्र | त | ल | प | आ | धु | र | ई |
| ड | र | त | र | कि | म | चा | क | दु | ठ |
| क | र्ण | णा | नि | प | भा | ज | ट | न | र्ग |
| ध | या | ळ | स | ब | पा | जं | जी | रा | म |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## उ) 'ळ' ची गंमत

हाताचे शेवटचे बोट - करंगळी

पुरण घालून करतात ती - पुरणपोळी

फुलाचा भाग - पाकळी

न उमललेले फूल - कळी

एका हाताने वाजत नाही ती - टाळी

लाकडे एकत्र बांधून केलेली - मोळी

दिव्यांचा सण - दिवाळी

## खालील माहिती ध्यानात ठेवा.

* 'रायगड' हा छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेला किल्ला होता.
* राणी चन्नम्मा यांनी कित्तूर येथील किल्ल्यामधून इंग्रजांविरुद्ध युद्ध केले.
* ओणके ओब्बवांनी चित्रदुर्गच्या किल्ल्यात हैदरअलीच्या सैनिकांना मुसळाने मारले होते.
* 'तोरणा' किल्ला जिंकून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे तोरण बांधले होते.
* 'प्रतापगड' येथे छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा वध केला होता.
* पुरंदर गडावर छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झाला होता.

## उपक्रम

* तुमच्या जवळपास असलेल्या किल्ल्याला भेट द्या.
* वेगवेगळ्या किल्ल्यावर घडलेल्या ऐतिहासिक घटनांची माहिती मिळवा.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**विचारधन**

माणसाचे श्रेष्ठत्व हे त्याच्या जन्मावरून ठरत नसून त्याच्या गुणकर्मावरून ठरते.

***

# पाठ - 12

# आग्रा भेट व सुटका

१२ मे १६६५ रोजी छ. शिवाजी महाराज, मिर्झा राजा जयसिंग यांच्या आग्रहाखातर आग्रा भेटीला गेले.







मिर्झाराजांच्या आमंत्रणाला मान देऊन छ. शिवाजी महाराज व युवराज संभाजी राजे निवडक मावळ्यांसोबत आग्राभेटीला निघतात.



छ. शिवाजी महाराज युवराज संभाजी राजेंसह औरंगजेबाच्या दरबारात हजर राहतात.







रामसिंह...! आपल्या बादशहाने स्वराज्याचा अपमान केला आहे. हा अपमान मी कधीच सहन करू शकणार नाही.
राजे...! आपण शांत व्हा. बादशहांशी मी बोलेन, आपण विश्रांती घ्यावी.
बादशहाच्या आदेशाचे पालन करीत सेवक महाराजांना बंदी बनवतात..
महाराज...! आपण बादशहाच्या आदेशाशिवाय बाहेर जाऊ शकत नाही.
सेवकहो...! आपण बादशहाला सांगा, मला पोटदुखीच्या आजारातून मुक्त करणाऱ्या साधू व मौलवींना मिठाई पाठवयाची आहे.
जी हुजूर..! ही गोष्ट बादशहाच्या कानावर घालू..!
सेवकांनो....! ही मिठाई साधू व मौलवी यांच्यापर्यंत पोहचवा.
थांबा..! या पेटीत काय आहे? तपासणी केल्याशिवाय आपण ही पेटी घेऊन जाऊ नये.
हुजूर..! छ. शिवाजीराजांनी साधू, मौलवींना मिठाई घेऊन जाण्याची आज्ञा केली आहे.
भोई..! थांबा पेटीमधून मिठाईच घेऊन जात आहात की आणखी काही ?
हुजूर ..! मिठाईचं आहे.


मी खरोखर आजारी असल्याचा आता द्वारपालांना विश्वास झाला आहे. या कैदेतून बाहेर पडण्याची हीच योग्य वेळ आहे.
छ. शिवाजी महाराज नजरकैदेतून बाहेर पडण्यासाठी पेटीचा वापर करतात. एका पेटीमध्ये युवराज संभाजी राजे व दुसऱ्या पेटीमध्ये स्वतः छ. शिवाजी महाराज बसतात.
महाराज मिठाईच्या पेटीत बसून औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन निसटतात.
हिरोजी फर्जंद स्वतः महाराजांच्या पलंगावर महाराज आहेत, असे भासविण्यासाठी झोपतात.
सेनापती..! आपण शंभूराजांना घेऊन मथुरेस जावे. आम्ही राजगडावर सुखरूप पोहचेपर्यंत बाळराजांची काळजी घ्यावी.
छ. शिवाजी महाराज राजगडावर पोहोचल्याची बातमी राजमाता जिजाऊंना कळताच त्या भेटीला येतात.
शिवबा..! आपण आलात, जगदंबाच पावली. तिच्या कृपेने व आपल्या धाडसाने, बुद्धिचातुर्याने आपण सुखरूप पोहचलात.
होय आऊसाहेब,,! आपल्या आशीर्वादाने व जगदंबेच्या कृपने आम्ही सुखरूप पोहचलो.

## नवीन शब्दार्थ :

दख्खन = दक्षिण भारत, नजराणा = वरिष्ठाला द्यायची भेटवस्तू

हातावर तुरी देणे = फसवून निसटून जाणे

दगाफटका करणे = विश्वासघात करणे, धोका देणे.

## टिपा :

1) छत्रपती शिवाजी महाराज : (1630 ते 1680) हिंदवी स्वराज्याचे संस्थापक. छत्रपतींनी आदिलशाही व मोगलशाही विरुद्ध संघर्ष करून हिंदवी स्वराज्य स्थापन केले.
2) छत्रपती संभाजी महाराज : (1657 ते 1689) छ. शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र, हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती. अवघे 9 वर्षांचे असताना आग्रा भेटीला छ. शिवाजी महाराजांसोबत गेले.
3) बादशहा औरंगजेब : (1618 ते 1707) मोगल साम्राज्याचा सहावा बलाढ्य शासक.
4) मिर्झाराजा जयसिंग : जयसिंग पहिला (1611 ते 1667) हा मोगल साम्राज्याचा वरिष्ठ सेनापती आणि अंबर (जयपूर) राज्याचा राजा होता.
5) रामसिंह - मिर्झाराजा जयसिंग याचा मुलगा.
6) जसवंतसिंह राठोड (1626 ते 1678) सध्याच्या भारतातील राजस्थान राज्यातील मारवाडचा राजा होता.
7) हिरोजी फर्जंद - छ. शिवाजी महाराजांचे सरदार होते. शिवरायांची आग्र्याहून सुटका झाली तेव्हा हिरोजी फर्जंद महाराजांच्या जागी झोपले होते.

NOT TO BE REPUBLISHED ©MTBS

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) छत्रपती शिवाजी महाराजांना आग्राभेटीचे आमंत्रण कोणी दिले ?
2) छत्रपती शिवाजी महाराज आग्राभेटीला केव्हा गेले ?
3) छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराजांच्या जीविताची हमी कोणी घेतली होती?
4) छत्रपती शिवाजी महाराजांनी मिठाई कोणाला पाठविली ?

## आ) कोण कोणास म्हणाले ते लिहा.

1) ''मिर्झाराजे, अफजलखानाप्रमाणे बादशहाने दगाफटका केला तर ?''

2) ''राजे...! आपण शांत व्हा...! बादशहाशी मी बोलेन आपण विश्रांती घ्या''.

3) ''होय आऊसाहेब..! आपल्या आशीर्वादाने व जगदंबेच्या कृपेने सुखरूप पोहचलो''.

## इ) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) जसवंतसिंह राठोडला पाहून शिवरायांना काय वाटले ?

2) औरंगजेबाच्या नजरकैदेतून छत्रपती शिवाजी महाराज कसे बाहेर पडले ?

3) शिवरायांनी सेनापतींना कोणती आज्ञा केली ?

4) जिजाऊंनी शिवबाचे कसे कौतुक केले ?

## ई) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

1) छत्रपती शिवाजी महाराज बादशहा औरंगजेब याच्या __________ व्या वाढदिवसाला आग्र्याला गेले.

2) छत्रपती शिवाजी महाराजांचा मान __________ रांगेतला.

3) ही मिठाई __________ व __________ यांच्यापर्यंत पोहचवा.

4) आपण शंभूराजांना घेऊन __________ जावे.

5) __________ स्वत: महाराज पलंगावर आहेत, असे भासविण्यासाठी झोपतात.

6) __________ ना कळताच त्या भेटीला येतात.

7) आपल्या आशीर्वादाने व __________ कृपेने आम्ही सुखरूप पोहचलो.

## उ) खालील शब्दांना विरुद्धार्थी शब्द लिहा.

| | | |
|---|---|---|
| 1) मान × | 2) हजर × | 3) विश्वास × |
| 4) पुढे × | 5) योग्य × | 6) धाडसी × |

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**उपक्रम :**

* 1) तुमच्या जवळच्या गडकिल्ल्यांना भेट द्या.

2) छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील एखादा प्रसंग रेखाटा.

* खालील तक्त्यातील महापुरुषांची नांवे ओळखा.



1) ____________

2) ____________

3) ____________

4) ____________

5) ____________

6) ____________

7) ____________

8) ____________

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

***

## आपण समजून घेऊया

कोणी जर विचारलं की आपण का बोलतो? तेव्हा प्रत्येकाकडून वेगवेगळी उत्तरं मिळतात, परंतु योग्य उत्तर असं आहे की -

* आपल्या मनातील विचार दुसऱ्याला समजावेत म्हणून आपण बोलतो.
  बोलणे कसे बनते ?
  बोलणे शब्दापासून बनते.
  मग शब्द म्हणजे काय ?
  एक किंवा अनेक अक्षरांच्या अर्थपूर्ण समूहाला शब्द म्हणतात.

* शब्दांच्या जाती आठ आहेत.
  1. नाम 2. सर्वनाम 3. विशेषण
  4. क्रियापद 5. क्रियाविशेषण 6. शब्दयोगी अव्यय
  7. उभयान्वयी अव्यय 8. केवलप्रयोगी अव्यय

**नाम :** वस्तूच्या, व्यक्तीच्या, पदार्थांच्या, स्थळांच्या नावाला 'नाम' असे म्हणतात.

उदा : राजू, महेश, बेळगाव, पुस्तक, हिमालय, गंगा, भाकरी.

खालील वाक्यातील नाम ओळखा.

1. सोहम अभ्यास करतो.
2. गायत्री गाणे गात आहे.
3. हा रस्ता निपाणीला जातो.
4. गाय दूध देते
5. आम्ही पुस्तके वाचतो.

### सर्वनाम

* नामाऐवजी येणाऱ्या शब्दाला 'सर्वनाम' असे म्हणतात.
  उदा: मी, आम्ही, आपण, तू, तुम्ही, तो, ती, ते, त्या, जो, जी, जे, ज्या, कोण, काय इत्यादी.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

* **खालील वाक्यांचे वाचन करा व अधोरेखित शब्दांचे निरीक्षण करा.**

1) गाय दूध देते. तिचे दूध पोषक असते.

2) कुत्रा हा प्रामणिक प्राणी आहे.

3) पुस्तक आपला मित्र आहे. ते आपल्याला ज्ञानी बनविते.

* **खालील उदाहरणांतील सर्वनाम ओळखा.**

1) ते घर आहे.

2) कावळा आला. तो उडाला.

3) ही गाय काळी आहे.

4) तुझे नाव काय आहे ?

5) मी गावाला जाते.

* **खाली काही वाक्ये दिली आहेत. त्यातील नामे ओळखून त्यासाठी योग्य ती सर्वनामे वापरा.**

1) समीर खूप हुशार आहे. __________ रोज शाळेत जातो.

2) पक्षी उडत उडत लांब गेले. __________ दिसेनासे झाले.

3) बाई मुलांना खाऊ वाटत होत्या. __________ मुलांशी गप्पा मारत होत्या.

4) दादा घरात गेला. __________ काही सुचेना.

* **खालील वाक्यांतील सर्वनामे अधोरेखित करा.**

1) मी शाळेतून आलो.

2) आम्ही उद्या सहलीला जाऊ.

3) ते गावाला गेले आहेत.

4) तुम्ही जेवण करा.

5) तो गाणे गातो.

6) आपण अभ्यास करूया.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

V3H5P3

# पाठ -13

## शाळा




©KTBS NOT TO BE REPUBLISHED

बोट धरूनी ज्ञानी करूनी, अमृत पाजते माझी शाळा
अक्षर गिरवुनी जगात मिरवुनी, शहाणी करते बाळा ।।धृ।।

अंधार सारुनी उजळूनी टाकती, पेटवून ज्ञानज्योती
करूनी खुला बांधूनी झुला, उधळते अक्षरमोती
पंखी इवल्या देऊन सावल्या, मुक्त करते आभाळा ।।१।।

सारून दूर अज्ञानाचा पूर, उजळते अंधाराच्या राती
शिकवुनी अक्षर करुनी साक्षर, पेटवते ज्ञानज्योती
सावू ज्योतीची, भीमा शाहूची, शिवबाची पेटते ज्वाळा ।।२।।

शब्दांतून डुलते स्वरातून गाते, देत जाते बळ
अक्षर गिरवुनी शब्द वाचुनी, ज्ञानाची तळमळ
ज्ञान देते, भान येते, नव्या जगाचे भविष्य देते बाळा ।।३।।

**-श्री शिवाजी शिंदे, कुद्रेमनी**

## नवीन शब्दार्थ

अमृत = सुधा, पीयूष (जे पिल्यावर जीव अमर होतो.)

शहाणी = हुशार, अंधार = काळोख, आभाळ = गगन, आकाश

## अभ्यास

### अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) ज्ञानरूपी अमृत कोण पाजते ?

2) कवीने कोणती ज्योत पेटविण्यास सांगितली आहे ?

3) कवितेत कोणकोणत्या समाजसुधारकांचा समावेश केला आहे ?

4) ज्ञान आपल्याला काय देते ?

### आ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1) अक्षर गिरवुनी __________ शहाणी करते बाळा.

2) सारून दूर __________ उजळते अंधाराच्या राती.

3) __________ स्वरातून गाते, देत जाते बळ.

4) __________ भान येते, __________ भविष्य देते बाळा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### इ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) अमृत ×　　2) अंधार ×

3) ज्ञानी ×　　4) साक्षर ×

5) रात्र ×

### ई) कवितेतील तालबद्ध शब्दांची यादी बनवा.

## उ) नमुना दिल्याप्रमाणे लिहा.

नमुना : पाण्यातून




1. ______________
2. ______________
3. ______________
4. ______________
5. ______________
6. ______________
7. ______________
8. ______________
9. ______________

## उपक्रम

1) 'माझी शाळा' या विषयावर 10-15 ओळी निबंध लिहा.

2) विद्यार्थी असा असावा.




@KTBS NOT TO BE REPUBLISHED

3) मुलाला शाळेत जाण्याचा मार्ग दाखवा.



©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**विचारधन**

मज नकोत अश्रू घाम हवा; हा नव्या युगाचा मंत्र नवा.

***

# पाठ - 14

## मुंगी

L6T6B4



शनिवार होता. पिंटू शाळा संपवून घरी आला. घरातील सर्व मंडळींची जेवणे झाली. वामकुक्षी घेण्यासाठी बाबा पलंगावर आडवे झाले. आई घरातील कामे आवरीत होती. पिंटू घराबाहेर येऊन एकटाच खेळू लागला.

इतक्यात त्याचे लक्ष तेथून जात असलेल्या मुंग्यांच्या रांगेकडे गेले. तो पाहू लागला. मुंग्या एका रांगेत एका दिशेने जात होत्या. पिंटू पाहतच राहिला. पिंटूची उत्सुकता शिगेला पोहोचली. इतक्यात आईची हाक आली, ''पिंटू ... अरे पिंटू, काय करतो आहेस?''आईची हाक ऐकून पिंटूला खूप बरे वाटले. त्याने बसल्या ठिकाणावरूनच आईला आवाज दिला, ''आई इकडे ये. इकडे बघ या मुंग्या.''

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

आई गडबडीने पिंटूजवळ जाली. तिने मुंग्यांची रांग पाहिली. आईला पिंटूची खूप गंमत वाटली. त्याची उत्सुकता पाहून तिला खूप बरे वाटले. तिने पिंटूला विचारले, ''पिंटू पाहिलंस का मुंग्यांना?'' पिंटू म्हणाला, ''हो, पण मला मुंग्यांची भीती वाटते. मुंग्या चावल्या तर ?''

आई हसली व म्हणाली, ''अरे, मुंग्या काय फक्त चावतातच काय ? त्या मुंग्यांच्या इतर गोष्टी लक्षात घेतल्यास का ? इवल्याशा मुंग्यांकडून खूप काही शिकण्यासारखे आहे''.

पिंटू हसला व म्हणाला, ''आई, या एवढ्याशा मुंग्यांकडून आम्ही काय शिकायचे?'' आई हसत म्हणाली, ''अरे, निसर्गातील सर्व गोष्टी आपणास काही ना काही शिकवत असतात. आपण ते पाहिले पाहिजे. बघ जरा बारकाईने त्या मुंग्यांकडे! त्या एकामागून एक कशा चालतात पहा. आपण असे शिस्तीने वागतो का ?''

पिंटू विचारात पडला. आई पुढे म्हणाली, ‘‘इतकेच नव्हे, मुंगीचे इतर गुण पाहिलेस का ? त्या सतत कामात असतात. काहीतरी ने आण करीतच असतात आणि तू बघ, जरा दुकानात जा म्हटलं की कंटाळा करतोस.’’

पिंटू खजील झाला. तो म्हणाला, ‘‘आई तुझे म्हणणे बरोबर आहे. तू मुंग्यांबद्दल आणखी काही सांगू शकतेस का ?’’

आई हसली म्हणाली, ‘‘मुंग्यांबद्दल खूप सांगण्यासारखे आहे. मुंग्या खूप धाडसी असतात.’’

‘‘काय ?’’ पिंटू जवळ जवळ किंचाळलाच. ‘‘एवढ्याशा मुंग्या आणि धाडसी ?

‘‘होय’’ आई म्हणाली, ‘‘मुंग्या मोठा कीटक किंवा प्राण्यालाही घाबरत नाहीत. आणखी एक गंमत तुला माहीत आहे का ? मुंग्या न घाबरता माणसाजवळही येतात व आपल्या अंगावर चढतात. आपण हालचाल केल्यास त्या जोराने चावा घेतात. हो ना?’’

पिंटूचा चेहरा पाहून त्याच्या मनातले भाव आईने ओळखले व म्हणाली, ‘‘मुंगी एवढीशी, पण तिच्यात हे धाडस कोठून येते ? असा प्रश्न पडला ना तुला ?’’

‘‘हो’’ पिंटू म्हणाला.

‘‘मुंग्यांच्यामध्ये हे धाडस येते ते त्यांच्यामध्ये असलेल्या एकीमुळे. सगळीकडे पहा, मुंग्या समूहानेच राहतात. एकाच दिशेने जातात. आपण सर्वांनी मुंग्यांकडून एकीचा हा धडा घेतलाच पाहिजे.’’

‘‘हे कधी माझ्या लक्षात आले नाही’’ पिंटू म्हणाला.

‘‘खरोखरच एवढीशी मुंगी पण आपण त्यांच्याकडून खूप काही शिकू शकतो.’’

‘‘शेवटचा पण आणखी एक महत्वाचा गुण तुला माहीत आहे का ? त्या आपल्या आजूबाजूच्या सर्व परिस्थितीशी जुळवून घेतात. ऊन, पाऊस, वारा काही असू दे, कसलीही अडचण असू दे, त्या सर्व परिस्थितीशी जुळवून घेतात. आपणही तसे वागले पाहिजे. जीवनात कोणतेही संकट, वाईट परिस्थिती आली तरी आपण न डगमगता त्या परिस्थितीशी जुळवून घेतले पाहिजे’’. पिंटू विचार करू लागला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आई पुढे म्हणाली, ''परवा तुझेच पहा. भाषणात तुझा नंबर आला नाही म्हणून तू खूप नाराज झाला होतास. पुन्हा भाषण करणार नाही असे म्हणत होतास पण आपणास कधी अपयश आले तरी आपण खचून न जाता पुन्हा नवीन सुरुवात केली पाहिजे, मुंग्यांप्रमाणे.'' पिंटू मनापासून हसला.

### नवीन शब्दार्थ

- ✻ वामकुक्षी = दुपारच्या जेवणानंतर घेतलेली झोप
- ✻ इवलीशी = लहान, छोटीशी
- ✻ समूह = घोळका, गट
- ✻ अपयश = हार, पराभव
- ✻ शिगेला पोहोचणे = सर्वोच्च बिंदूला पोहोचणे
- ✻ खजील होणे = शरमणे
- ✻ किंचाळणे = ओरडणे

## अभ्यास

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1. शनिवारी पिंटू काय करीत होता ?
2. ''पिंटू पाहिलंस का मुंग्यांना ?'' असे कोणी कोणास म्हटले ?
3. मुंग्या कशा जातात ?
4. मुंग्या कशामुळे धाडसी होतात ?
5. आपण अपयश आले तरी कसे राहिले पाहिजे ?

### आ) रिकाम्या जागा भरा.

1. मुंग्या एका ____________ चालतात.
2. ''तू बघ, जरा दुकानात जा म्हटलं तरी ____________ करतोस.''
3. मुंग्या खूप ____________ असतात.
4. मुंग्यांमध्ये धाडस ____________ येते.
5. मुंग्या सर्व परिस्थितीशी ____________ घेतात.

इ) खालील चित्र पहा व तुम्हाला समजलेले मुंगीचे गुण चित्रात लिहा.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ई) पुढील शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

1) रांग 2) भीती 3) गंमत

4) निसर्ग 5) कंटाळा

उ) खाली दिलेल्या एका शब्दापासून त्याच शब्दाची सामान्य स्वरूपे लिहा -

उदा :

पैसा →पैशाला, पैशाने, पैशासाठी, पैशांचा, पैशाहून

1) ससा 2) मासा

**ऊ) निसर्गातील सर्व घटक आपणास काही ना काही शिकवीत असतात. आपण डोळसपणे शिकले पाहिजे.**

खाली दिलेल्या घटकापासून आपण काय शिकू शकतो हे शिक्षक व पालकांच्या मदतीने समजून घ्या व लिहा.

1) समुद्र = ______________________________

______________________________

2) पर्वत = ______________________________

______________________________

3) वृक्ष = ______________________________

______________________________

4) नदी = ______________________________

______________________________

5) जमीन = ______________________________

______________________________

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**विचारधन**

घाम गाळल्याशिवाय दामाची खरी किंमत कळत नाही.

***

# विशेषण

**✻ नामाबद्दल व सर्वनामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला 'विशेषण' असे म्हणतात.**

उदा : गोड चिकू, उंच मुलगा, सुंदर फूल
बोलकी बाहुली, घनदाट जंगल, सुगंधी तेल.

**✻ कसे ते लिहा.**

1) कलिंगडाचा आकार कसा ? [ ]

2) कलिंगडाचा रंग कोणता ? [ ]

3) कलिंगडाची चव कशी? [ ]



**✻ तुम्ही चौकामध्ये लिहिलेले शब्द कलिंगडाची विशेषणे आहेत.**

खालील वाक्यातील विशेषणे ओळखा.

1) शोभाचा मंजूळ आवाज घुमला.
2) झाडावर सुंदर मोर बसला होता.
3) बागेत शेकडो फुले फुलली होती.
4) तो मुलगा हुशार आहे.
5) शहाणी मुले नियमित अभ्यास करतात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# क्रियापद

**वाक्याचा अर्थ पूर्ण करून क्रिया दाखविणाऱ्या शब्दाला 'क्रियापद' असे म्हणतात.**

उदा : खेळणे, वाचणे, लिहिणे, बोलणे, येणे.

**खालील शब्दसमूह वाचा.**

✻ विद्यार्थी शाळेमध्ये

✻ मुले कबड्डी

वरील शब्दसमूह वाचताना नेमकी कोणती क्रिया झाली हे समजत नाही. त्याचा नेमका अर्थ कळत नाही ते अपूर्ण आहेत असे वाटते.

1) विद्यार्थी शाळेमध्ये शिकतात.

2) मुले कबड्डी खेळतात.

असे लिहिले की 'शिकतात' व 'खेळतात' या शब्दांमुळे नेमकी कोणती क्रिया झाली आहे हे समजते, अर्थ समजतो. अशा शब्दांना 'क्रियापदे' असे म्हणतात. वरील वाक्यांमध्ये अधोरेखित केलेले शब्द क्रियापदे आहेत.

## अ) खालील वाक्यातील क्रियापदे ओळखा.

→ साई आंबा खातो.

→ धनश्री गाणे गाते.

→ मुले क्रिकेट खेळतात.

→ ती पुस्तक वाचते.

→ मीरा गावाला जाते.

## आ) चित्र पाहून क्रियापद ओळखा.






________ ________ ________ ________

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पाठ - 15

# सुधा मूर्ती



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सुप्रसिद्ध लेखिका, अभियंता आणि सामाजिक कार्यकर्त्या सुधा मूर्ती कोणाला माहीत नाहीत ? सर्व भारतीयांना अभिमान वाटावा असं हे व्यक्तिमत्तव! हात आकाशाला पोहोचले तरीही जमिनीशी पाय घट्ट रोवून कसं उभं रहावं याचं उत्तम उदाहरण म्हणजे सुधा मूर्ती !

शिग्गाव या कर्नाटकातील छोट्याशा गावात सुधा मूर्तींचा जन्म 19 ऑगस्ट 1950 रोजी अतिशय संस्कारशील कुटुंबात झाला. लहानपणापासूनच अतिशय हुशार विद्यार्थिनी म्हणून त्यांचा लौकिक होता. अभियांत्रिकीचे पदव्युत्तर शिक्षण त्यांनी सुवर्णपदकासह पूर्ण केले. त्याकाळात इतके उच्च शिक्षण घेऊनही त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कधीही अहंकार दिसत नाही.

आपल्या कार्याची सुरुवात त्यांनी अभियंता म्हणून केली. 'टेल्को' कंपनीत निवड झालेल्या त्या पहिल्या महिला अभियंता होत्या. त्यांनी काही काळ प्राध्यापिका म्हणूनही सेवा बजावली आहे आणि आता स्वतःला समाजसेवेत झोकून दिले आहे.

नारायण मूर्ती या तितक्याच तोलामोलाच्या अभियंता असलेल्या व्यक्तीशी त्यांचा विवाह झाला. अतिशय सरळ स्वभावाचे, बुद्धिमान व समाजाविषयी कळवळा असलेले नारायण मूर्ती नोकरीत रमले नाहीत. त्यांचे पाचसहा सहकारी व त्यांनी मिळून स्वतःची कंपनी काढायची असे ठरविले. या कामाची सुरुवात करण्यासाठी सुधा मूर्तींनी त्यांना दहा हजार रुपये दिले आणि अवघ्या दहा हजार रुपयात कंपनी सुरू झाली. या कंपनीचे नांव 'इन्फोसिस!'. आज ही जगातील एक प्रसिद्ध सॉफ्टवेअर कंपनी आहे. लाखो लोकांना त्यामुळे रोजगार मिळतो आहे.

इन्फोसिसच्या 'इन्फोसिस फाउंडेशन' या सेवाभावी संस्थेमार्फत ग्रामीण विकास, आरोग्य, शिक्षण, कला, संस्कृती, निराश्रित इत्यादींसाठी मोठ्या प्रमाणात कार्य केले जाते. सुधा मूर्तींनी स्वतःला या कार्याला वाहून घेतले आहे.

या सर्व कार्यांबरोबर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्या जगप्रसिद्ध लेखिका आहेत. बालसाहित्य, कथा, कादंबऱ्या, ललित लेखन इ. साहित्य प्रकारांत त्यांनी कन्नड व इंग्रजीमध्ये विपुल प्रमाणात लेखन केले आहे. त्यांची जवळजवळ सर्व पुस्तके मराठीत अनुवादित झाली आहेत. कार्य करताना आलेले अनुभव, सामान्य माणूस हे त्यांच्या लेखनाचे विषय आहेत.

त्यांच्या या प्रचंड कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. अनेक विद्यापीठांनी 'डॉक्टरेट' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला आहे. इ.स. 2006 साली भारत सरकारने 'पद्मश्री' हा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे.

अशा या सुधा मूर्ती सर्वांसाठी विशेषतः स्त्रियांसाठी प्रेरणा देणाऱ्या ठरल्या आहेत. बुद्धिमत्ता, प्रामाणिकता, औदार्य यांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. हे सारे आपल्याला खूप काही शिकवून जाते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

### नवीन शब्दार्थ :

तोलामोलाचा = समान दर्जाचा, कळवळा = कळकळ, प्रेम
बुद्धिमान = हुशार, रोजगार = नोकरी, काम, विकास = प्रगती
कार्य = काम, निराश्रित = आश्रय नसलेले, औदार्य = उदारता.

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) सुधा मूर्तींचा जन्म केव्हा व कोठे झाला ?

2) सुधा मूर्तींनी कोणते शिक्षण घेतले ?

3) सुधा मूर्तींनी प्रथम कोणत्या कंपनीमध्ये नोकरी स्वीकारली?

4) सुधा मूर्तींचा विवाह कोणाशी झाला ?

5) नारायण मूर्तींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कोणती कंपनी स्थापन केली ?

### आ) खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यांत लिहा.

1) इन्फोसिस फाउंडेशन मार्फत कोणकोणती कामे केली आहेत ?

2) सुधा मूर्तींच्या लेखनाबद्धल माहिती द्या.

### इ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1) सुधा मूर्तींना 2006 साली __________ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

2) सुधा मूर्तींनी आपल्या कार्याची सुरूवात _________ म्हणून केली.

3) _________ रुपयात इन्फोसिस कंपनीची सुरूवात केली.

4) इन्फोसिस सुरू करण्यासाठी _________ यांनी पैसे दिले.

### ई) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.

1) कार्य          2) अहंकार

3) घर          4) पाणी

5) हात

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## उ) खालील इंग्रजी शब्दांसाठी मराठी शब्द लिहा.

1) इंजिनियर = ________________

2) सायन्स = ________________

3) टी.व्ही = ________________

4) कंप्यूटर = ________________

## उपक्रम

* समाजातील कर्तृत्ववान महिलांविषयी आपल्या शिक्षकांकडून व पालकांकडून माहिती मिळवा.
* सुधा मूर्तींचे बालसाहित्य मिळवून वाचा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**विचारधन**

स्वत:साठी जगण्यात आनंद आहे, पण दुसऱ्यासाठी जगण्याचा आनंद अधिक आहे.

***

## पाठ - 16

# धरत्रीले दंडवत

काया काया शेतामंधी
घाम जिरव जिरव
तव्हा उगलं उगलं
कायामधून हिरवं !

येता पीकाले बहार
शेताशेतात हिर्वय
कसं पिकलं रे सोनं
हिर्व्यामधून पिवयं !

अशी धरत्रीची माया
अरे, तीले नही सीमा
दुनियाचे सर्वे पोटं
तिच्यामधी झाले जमा

शेतामधी भाऊराया
आला पीकं गोंजारत
हात जोडीसन केला
धरत्रीले दंडवत

शेतामधी भाऊराया
खाले वाकला वाकला
त्यानं आपल्या कपायी
टिया माटीचा लावला

अशी भाग्यवंत माय
भाऊरायाची जमीन
वाडवडीलाचं देवा,
राखी ठेव रे वतनं !

**- बहिणाबाई चौधरी**



@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**नवीन शब्दार्थ :**

| | | |
|---|---|---|
| काया = काळ्या, | हिर्वय = हिरवळ, | धरत्री = धरती |
| दुनिया = जग, | टिया = टिळा, | माय = आई |
| कपायी = कपाळी, | दंडवत = साष्टांग नमस्कार | |

**टीप :**

बहिणाबाई चौधरी (1880-1951) एक निरक्षर कवयित्री. त्यांनी जीवनातील विविध अनुभव समर्थपणे कवितेतून व्यक्त केले. जिव्हाळ्याची बोली हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य. जळगाव येथे शेतकरी कुटुंबात आयुष्य गेल्यामुळे त्यांच्या लेखनात खानदेशी व वऱ्हाडी भाषेचा वापर झाला आहे. (या भाषेत 'ळ' ऐवजी 'य' चा वापर आढळतो.)

## अभ्यास

**अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) शेतात पीक केव्हा पिकेल ?
2) सोनं कशाला म्हटले आहे?
3) कवितेतील आई कोण?
4) भाऊरायाने कोणाला दंडवत केला ?
5) भाग्यवंत माय कोण ?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**आ) जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| 1) शेतात घाम जिरव | - सीमा नाही. |
| 2) हिर्व्यामधून पिवळं | - धरत्रीला वंदन केले. |
| 3) धरत्रीच्या मायेला | - काळ्यामधून हिरवं उगेल. |
| 4) भाऊरायाने हात जोडून | - सोने पिकेल. |

## इ) कवितेच्या ओळी पूर्ण करा.

1) येता पिकाले __________
_______________ हिर्वय
कसं पिकलं __________
_______________ पिवयं ।

2) शेतीमधी ____________
______________ वाकला
त्यानं _______________
______________ लावला ।

## ई) खालील अर्थाच्या कवितेच्या ओळी लिहा.

1) पृथ्वीच्या मोठेपणाला मर्यादाच नाही. तिच्या पोटात सारे जग सामावू शकते.
2) पिकाला हाताने कुरवाळीत येऊन भाऊरायाने दोन्ही हातांनी धरत्रीला दंडवत घातला.
3) भाऊरायाने शेतात खाली वाकून जमिनीची माती आपल्या कपाळाला लावली.

## उ) समानार्थी शब्द लिहा.

1) धरती 2) माय 3) कपाळ 4) दंडवत

## ऊ) खालील शब्दांना प्रासबद्ध शब्द लिहा.

1) जिरव 2) सीमा 3) गोंजारत 4) वाकला

## उपक्रम

1) ही कविता नृत्याच्या स्वरूपात सादर करा.
2) 'देव अजब गारोडी' ही बहिणाबाईंची कविता मिळवून शिक्षकांकडून समजून घ्या.
3) शेतकरी गीतांचा संग्रह करा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

पाठ - 17

# साप .... साप !!

X6A8J6

दुपारची वेळ होती. जेवणे झाली होती. टम्म भरलेल्या पोटावर हात फिरवत मंडळी स्वस्थ पडून होती. सारी गल्ली शांत होती आणि अशावेळी चिम्याचा दमदार आवाज घुमला..

'साप ऽऽऽ साप ऽऽऽ'

'साप' म्हटल्याबरोबर वातावरण एकदम बदलले. आळस, पेंग कुठल्याकुठे पळाले. पोटाच्या नगाऱ्यावर हात फिरवणारे बंडोपंत खाटेवरून दाणकन् फरशीवर आदळले. जपमाळ ओढत पेंगणारी बया म्हातारी चट्कन उठली. वेगाने बाहेर धावणारा बब्या तिला धडकला आणि दोघेही खाली कोसळले. अंधूक दृष्टीचे असलेले नाना 'काय-काय'? असे मोठ्याने केकाटत बाहेर पडले. पम्या पैलवान, शंकोबा सुतार, काळोबा, गलेलठ्ठ ठमाकाकू आणि पोरे-टोरे सारे आपापल्या घरातून भूकंप झाल्यासारखे बाहेर येऊन चिम्याभोवती गोळा झाले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

''अजगर आहे की नाग?'' शंकोबाने प्रश्न केला.

''आपल्या भागात नाग नाहीत''. भेदरलेले बंडोपंत चाचरत म्हणाले, ''बहुधा धामण असावी''. ''का ? घोणस का असू नये ? अगदी आफ्रिकेतला अनाकोंडासुद्धा असेल ! परवाच आम्ही टी. व्ही. वर बघितला. चांगला एकोणतीस इंची टी.व्ही आहे आमचा म्हटलं.'' बंडोपंतांना मागे सारीत ठमाकाकू जोराने म्हणाल्या. बंडोपंतांनी त्यांच्या टी.व्ही. ला नावे ठेवल्याचे त्यांना कळले होते.

ठमाकाकूंचा भसाडा आवाज बहिऱ्या नानांना ऐकू आला. ते त्राग्याने म्हणाले, ''टी.व्ही. ची चर्चा करण्यासाठी ही धावपळ ? मूर्ख लेकाचे ?''

''टी.व्ही. नव्हे नाना ऽऽ'' पम्या ओरडला.

''मग?''

''साप ऽऽ साप ऽऽऽ''

''बाप ? पम्या !'' चिडून हातवारे करीत नाना फुस्कारले, ''कुणाचा बाप काढतो रे ? थोबाड फोडीन''.

‘‘बाप नव्हे .... साप ऽऽ सा ऽऽऽ प ऽऽऽ’’.

‘‘साप होय’’ शांत होत नाना म्हणाले, ‘‘सापाचं आता काय ? परवाच तर नागपंचमी झाली की.’’

‘‘यांना आधी धड नीट ऐकू येत नाही आणि उगाच मधेमधे तोंड खुपसत असतात’’.

काळोबा हळू आवाजात शंकोबाच्या कानात पुटपुटला.

‘‘काळ्या ऽऽ’’ नाना गर्रदिशी वळून काळोबाला म्हणाले, ‘‘मी मध्ये तोंड खुपसतो काय ? कानफटीत देईन.’’

‘‘याला नेमकं तेवढं ऐकू जातं’’ शंकोबा उद्गारला.

‘‘नाना, जरा शांत व्हा बघू’’ ठमाकाकू जोराने म्हणाल्या.

‘‘चिम्या, कुठे आहे रे साप ? दुपारची मालिका सोडून आलेय मी’’.

‘‘तुमच्या पायाखालीच!’’

चिम्या चित्कारला आणि त्याचक्षणी तेथे कोलाहल माजला.

‘पायाखालीच’ हा शब्द कानावर पडल्याबरोबर ठमाकाकूंनी जागेवरूनच तीन फूट पाठीमागे उडी ठोकली. त्यांचा जोरदार धक्का किडमिड्या नानांना बसला. नाना उंच उडाले आणि बंडोपंताच्या पोटावर आदळले. बंडोपंत खाली आपटले, ते नेमके बब्याच्या अंगावर! मघाशी बया म्हातारीला धडकून पडलेला बब्या पुन्हा बंडोपंताच्या अंगाखाली सापडताच संतापला.



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

साऱ्या गल्लीत कडकडून चावण्यासाठी बब्या प्रसिद्ध होता. बंडोपंताच्या पुष्ट पिंडरीमध्ये त्याने दात घुसविले. त्याचबरोबर त्यांनी मोठी किंकाळी फोडली. अंधूक दृष्टीचे आजोबा या साऱ्यांना तुडवीत पलीकडे गेले आणि म्हणाले, ''कुठाय साप?''

''थांबा ऽऽ शांत व्हा !'' चिम्या ओरडला. ''हा बघा साप आणि त्याने छोट्या दगडाखालून एक वळवळणारे गांडूळ बाहेर काढले.

त्याबरोबर एकच हशा उसळला.

-प्रा. डॉ. विनोद गायकवाड

**नवीन शब्दार्थ :**

खाट = पलंग, केकाटणे = जोरात ओरडणे,

भेदरणे = घाबरणे, त्रागा = त्रास, कोलाहल = गोंधळ,

स्वस्थ पडणे = विश्रांती घेणे, चित्कारणे = किंचाळणे

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## अभ्यास

**अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) दुपारच्या वेळी जेवणे झाल्यावर मंडळी काय करत होती ?

2) ''अजगर आहे की नाग ?'' असा प्रश्न कोणी केला ?

3) ठमाकांकूनी टी.व्ही. वर सापाचा कोणता प्रकार बघितला ?

4) नानांना सापाऐवजी काय ऐकू आले ? का ?

5) चिम्याने दगडाखालून काय बाहेर काढले ?

**आ) खालील वाक्ये कोणी, कोणास म्हटली ते सांगा.**

1) ''का ? घोणस का असू नये ?''

2) ''यांना धड नीट ऐकू येत नाही आणि उगाच मधेमधे तोंड खुपसत असतात''.

3) ''चिम्या, कुठे आहे रे साप ? दुपारची मालिका सोडून आलेय मी''.

## इ) योग्य जोड्या जुळवा

| अ | ब |
|---|---|
| 1) पोटाच्या नगाऱ्यावर हात फिरवणारे | ठमाकाकू |
| 2) जपमाळ ओढत पेंगणारी | नाना |
| 3) अंधूक दृष्टीचे | बंडोपंत |
| 4) बहिरे | बया म्हातारी |
| 5) गलेलठ्ठ | आजोबा |

## ई) कंसातील योग्य शब्द ठेवा व बाकीचे खोडा.

1) साप म्हटल्याबरोबर एकदम (आवरण, वातावरण, पर्यावरण) बदलले.

2) ठमाकाकूंचा (भसाडा, गोड, हळू) आवाज बहिऱ्या नानांना ऐकू आला.

3) त्याने छोट्या दगडाखालून एक वळवळणारे (बेडूक, गांडूळ, सापाचे पिल्लू) बाहेर काढले.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## उ) विरुद्धार्थी शब्द लिहा.

1) शांत ×
2) बाहेर ×
3) चांगला ×
4) मूर्ख ×
5) लठ्ठ ×
6) हसणे ×

## ऊ) खालील वाक्यांतील विशेषणांना अधोरेखित करा.

1) चिम्याचा दमदार आवाज घुमला.

2) ठमाकाकूंचा भसाडा आवाज नानांना ऐकू आला.

3) नाना बहिरे होते.

4) आजोबांची दृष्टी अंधूक होती.

5) गलेलठ्ठ ठमाकाकूनी जागेवरूनच तीन फूट पाठीमागे उडी ठोकली.

## ए) नाम व विशेषणाच्या जोड्या जुळवा

| अ | ब |
|---|---|
| 1) टम्म | नाना |
| 2) अंधूक | काकू |
| 3) गलेलठ्ठ | आवाज |
| 4) भसाडा | पोट |
| 5) बहिरे | दृष्टी |

## ऐ) उदाहरणात दाखविल्याप्रमाणे शब्द बनवा.

दम - दमदार

1) रुबाब ______ 2) धार

3) समजूत 4) पाणी

5) चमक 6) तजेल

## उपक्रम

* **उच्चारांची गंमत**
* **खालील वाक्ये आधी सावकाश म्हणा नंतर वेग वाढवत म्हणा. काय गंमत होते ते सांगा.**

1) काळे राळे, गोरे राळे, राळ्यात राळे मिसळले

2) कच्चा पापड, पक्का पापड

* **तुम्ही पाहिलेल्या विनोदी प्रसंगाचे वर्णन करा.**
* **वरील कथेचे कथाकथन करा.**
* **द.मा. मिरासदार व पु.ल. देशपांडे यांच्या विनोदी कथा वाचा.**
* **सापांच्या विविध जातींची माहिती मिळवा.**

### सारे हसूया



मनोज कडक उन्हात उभा आहे ते पाहून आई ओरडली, ‘‘मनू ऽऽऽ अरे उन्हात काय करतोस ?’’

मनोज : ‘‘आई खूप घाम आलाय तो वाळवतोय’’.

***

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# काळ

* वाक्यात दिलेली क्रिया कोणत्या वेळी झाली आहे याचा बोध होतो. त्यास 'काळ' असे म्हणतात.
* काळाचे मुख्य प्रकार तीन आहेत.

1) **वर्तमान काळ :** क्रियापदाच्या रूपावरून क्रिया 'आता' घडते आहे असे जेव्हा समजते तेव्हा तो 'वर्तमान काळ' असतो.

उदा : 1) मी अभ्यास करतो.
2) आरती गाणे गात आहे.
3) साई खेळत आहे.
4) तो पळत आहे.

2) **भूतकाळ :** क्रिया 'पूर्वी' घडली आहे असे जेव्हा कळते तेव्हा तो 'भूतकाळ' होतो.

उदा : 1) मी निबंध लिहिला होता.
2) शिवाजी महाराज शूर राजे होते.
3) रमेश हुशार विद्यार्थी होता.
4) महात्मा फुले थोर सुधारक होते.

3) **भविष्यकाळ :** क्रिया 'पुढे' घडेल असे जेव्हा कळते तेव्हा तो 'भविष्यकाळ'होतो.

उदा :1) मी अभ्यास करेन.
2) आपला भारत देश महासत्ताक बनेल.
3) गणेश उद्या गावाला जाईल.
4) सोनाली नृत्य करेल.

***

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# पाठ – 18

R9J4H4

# म्हणींच्या गमती



NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

मे महिन्याच्या सुट्टीतला रविवार. दुपारची जेवणं आटोपून मुलं खेळायला बाहेर पडली. मैदानावर पोहचतात, तोवर चंदूची आई त्याला बोलवायला आली. ''अरे ऊनबिन काय लागतंय का नाही ? संध्याकाळचं खेळा की, आता चला घरी.'' ''येतो, येतो'' म्हणून चंदू खेळतच राहिला. पाठोपाठ संध्याची आई आली.

''अगं ए ऽऽऽ किती तापलंय बघ. पाचनंतर खेळा की'' ती ओरडली. मुलं पुन्हा लंगडी खेळू लागली. थोड्या वेळात रचितचे बाबा आले. ''अरे मुलांनो सकाळी अन् संध्याकाळी मैदानात खेळायचं, दुपारी कुणाच्यातरी घरी खेळा.'' ते सगळ्यांना म्हणाले. फक्त 'थोडावेळच' असं म्हणत रचित लंगडी घालू लागला. तो चार पावलं गेला असेल, इतक्या त समीनाचे दादू म्हणजे आजोबा बोलवायाला आले. वैतागलेली समीना म्हणाली, ''काय हो दादू ? कुणीच मोठी माणसं खेळू देईनात. घरी चल, घरी चल करताहेत. अशी-कशी एकसारखी वागतात ती ?'' दादू हसून म्हणाले, ''बरोबर आहे बेटा, त्यांना काळजी वाटते तुमची कुठेही गेलात तरी **'पळसाला पानं तीनच'** असतात.''

शाळेत खेळांच्या स्पर्धा सुरू होत्या. बाईंनी नेहमीप्रमाणे वर्गातल्या सगळ्याच मुलांना भाग घ्यायला लावला होता. धावण्याची शर्यत सुरू झाली. सुरेश सोडला तर सगळी मुलं जोरात धावत होती. उत्तम चित्रं काढणारा सुरेश मैदानी खेळांबाबत आळशी म्हणून प्रसिद्ध होता. साहजिकच तो सगळ्यांत शेवटी



आला. धापा टाकत तो मुलांच्या घोळक्यात शिरला आणि म्हणाला, ''अरे खरं तर मी पहिला आलो असतो, पण आपल्या मैदानावर काळीमाती आहे''. ''म्हणजे काय ?'' सुहासने आश्चर्याने विचारले. ''अरे, मी जोरात धावलो असतो तर माझे पांढरेशुभ्र बूट मळले असते म्हणून मी हळू धावलो''. ''वा! याला म्हणतात, **नाचता येईना अंगण वाकडं**'' घोळक्यातही सुमन पट्कन म्हणाली.



प्रशांत सकाळी लवकर विशालच्या घरी आला. विशालच्या घरातील म्हैस कालच व्याली होती, म्हणून खरवस खायला मिळेल असा प्रशांतचा अंदाज होता. विशाल आणि त्याची भावंडं न्याहरी करीत होती. प्रत्येकाच्या वाटीतला खरवस पाहून प्रशांतच्या तोंडाला पाणी सुटलं. विशालची आई त्याला म्हणाली, ''प्रशांत चल, तू पण कर न्याहरी''. ''नको काकू मी खू ऽऽप खाल्लंय''. ''अरे, पण गूळ घातलेला खरवस तर घेशील की नाही?'' ''नको, नको काकू.'' प्रशांत म्हणाला. विशालच्या आईने वाटीत खरवस दिला. प्रशांतने लगेच तो घेतला. ''**ताकाला जाऊन भांडं लपवू नये**. खा लवकर.'' विशालची आई हसत म्हणाली.

वरील प्रसंगामधील रंगीत शब्दसमूह नीट वाचा. उदा **'पळसाला पानं तीनच'** म्हणजे कुठेही जा, परिस्थिती जवळपास सारखीच असते. सगळ्या मुलांना त्यांच्या घरचे लोक उन्हात खेळायला मनाई करतात; म्हणून **'पळसाला पानं तीनच'** असे म्हटले आहे. आपल्या भाषेमध्ये असे अनेक शब्दसमूह वापरले जातात. त्यांना आपण 'म्हणी' असे म्हणतो.

आता उरलेले दोन्ही प्रसंग वाचून रंगीत म्हणींचे अर्थ शोधा.

शिक्षकांशी, पालकांशी, मित्र-मैत्रिणींशी चर्चा करून आणखी म्हणी जमवा.

## नवीन शब्दार्थ व टिपा :

पळस : एकत्र तीन पानं असणारे झाड.

खरवस : कोवळ्या दुधात गूळ घालून शिजवून केलेला घट्ट खाद्यपदार्थ

म्हणी : मोजक्या शब्दात खूप मोठा अर्थ सामावलेला शब्दसमूह

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

1) दुपारच्या उन्हात मुले कोणता खेळ खेळत होती ?
2) समीनाचे दादू काय म्हणाले ?
3) शाळेत कोणत्या स्पर्धा सुरू होत्या ?
4) सुरेश काय म्हणून प्रसिद्ध होता ?
5) सुरेशचे बूट कोणत्या रंगाचे होते ?
6) प्रशांतच्या तोंडाला पाणी का सुटले ?

### आ) खालील वाक्ये कोणी कोणास म्हटली ते सांगा.

1) ''अरे ऊनबिन काय लागतंय का नाही ? संध्याकाळचं खेळा की, आता चल घरी.''
2) ''अरे मुलांनो सकाळी अन् संध्याकाळी मैदानात खेळायचं, दुपारी कुणाच्या-तरी घरी खेळा.''
3) ''अरे खरं तर मी पहिला आलो असतो, पण आपल्या मैदानावर काळी माती आहे.''
4) ''प्रशांत चल, तू पण कर न्याहरी.''

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम :** प्राण्यांची चित्रे पाहा. प्राण्याचे नाव गाळलेल्या जागी लिहून म्हणी पूर्ण करा.



वासरात लंगडी __________ शहाणी.



__________ हाती कोलीत.



आयत्या बिळात __________.



__________ गुळाची चव काय ?



अति शहाणा त्याचा __________ रिकामा.



__________ वरून शेळ्या हाकणे.



आंधळं दळतं __________ पीठ खातं.



__________ ची धाव कुंपणापर्यंत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**सारे हसूया**



मुलगा : आई, बागेत झाडांना पाणी घालू का ?
आई : नको बाळा बाहेर पाऊस पडतोय.
मुलगा : बरं, मग रेनकोट घालून पाणी घालतो !

***

## खालील चित्रांमध्ये काय योग्य, काय अयोग्य ते सांगा.













© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# गमतीचं पत्र

**हे पत्र वाचा आणि पुन्हा लिहून काढा.**

।।श्री।।

दि : ५+१/७-६/१०११×२

 बंगला

 मंदिराजवळ

 नगर, बेळगावी

प्रिय,

 कांत यास सप्रेम  वि.वि. मी 5+7-2 दिवसांपूर्वी  ने Aकटा  पूर येथे मामांकडे आलो.  ळीची सुट्टी मजेत जात आहे.  ळीत मी,  ,  , बेB व  ने  केला.  बनवला,  पुढे  घातली. रोज सकाळी  , दुपारी  ,रात्री  असा खूप मजेचा कार्यक्रम चालू आहे. मामांनी मला Eसापनिती, Bरबलाच्या गोष्टी आणि श्री  कथा ही पुस्तK दिली. मामांनी Aक  पाळला आहे. त्याचे नाव Tनू आहे. लगेच  पाठव.

क.लो.अ. ही.वि.

तुझा मित्र



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# तर मग गट्टी कोणाशी

‘‘तुझ्या गळा
माझ्या गळा
गुंफू मोत्यांच्या माळा ’’
‘‘ताई आणखी कोणाला ?’’
‘‘चल रे दादा चहाटळा’’ ।।1।।

‘‘तुझ कंठी
मज अंगठी आणखी गोऽफ कोणाला ?’’
‘‘वेड लागले दादाला !’’
‘‘मला कुणाचे ताईला !’’ ।।2।।

‘‘खुसू खुसू
गाली हसू
वरवर अपुले रुसू रुसू !’’
‘‘चल निघ येथे नको बसू’’
‘‘घर तर माझे तसू तसू’’ ।।3।।

‘‘कशी कशी
आज अशी
गंमत ताईची खाशी’’
‘‘आता गट्टी फू दादाशी’’
‘‘तर मग गट्टी कोणाशी ?’’ ।।4।।

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# फुलपांखरू

- ग.ह.पाटील

फुलपांखरूं !
छान किती दिसतें । फुलपांखरूं

या वेलीवर । फुलांबरोबर
गोड किती हसतें । फुलपांखरूं

पंख चिमुकले । निळेजांभळे
हालवुनी झुलतें । फुलपांखरूं

डाळे बारिक । करिती लुकलुक
गोल मणी जणुं ते । फुलपांखरूं

मी धरुं जाता । येई न हाता
दूरच तें उडते । फुलपांखरूं

***

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# शब्दसंग्रह

**अ**

अखंड

अगस्ती

अजिंक्य

अगणित

अनुस्वार

अमंगळ

आश्विन

अक्षयतृतीया

**आ**

आत्मा

आश्चर्य

**इ**

इंजिन

इंजिनियर

इतिहास

इस्त्री

**ई**

ईश्वर

ईशस्तवन

**उ**

उत्तम

उदरी

उद्योजक

उपचार

**अं**

अंगणात

अंबर

**ऑ**

ऑफिस

ऑलिम्पिक

**क**

कष्ट

कार्तिक

कांस्य

कुऱ्हाड

कुस्ती

कर्तृत्व

कृपादृष्टी

कृषक

कॅडबरी

कोल्होबा

कौशल्य

**ख**

खेळाडू

**ग**

गणेशोत्सव

गुढी

ग्रीष्म

**च**

चैत्र

चॉकलेट

चंदन

चंद्रगुप्त

**ज**

जन्माष्टमी

जन्मसोहळा

जिल्हा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**ट**

टायर

टरबूज

**त**

ताक

तोफ

**द**

दारिद्र्य

दुकानदार

दृश्य

दंतकथा

**ध**

धमाका

धरित्री

धाप

**न**

नसानसांत

निर्जीव

निश्चय

नृत्य

नृत्यनाट्य

निसर्गरम्य

नेम

नैपुण्य

**प**

पकड

परंपरा

परिचय

पुन:स्मरण

पौष्टिक

परमेश्वर

प्राण

प्रदान

प्रणिता

प्रभात

प्रमाणपत्र

प्रासबद्ध

पुरस्कार

पिंढरी

प्रशिक्षण

प्रेरणा

पृष्ठ

**ब**

बर्फ

बहरणे

बॉक्सिंग

बॅडमिंटन

**भ**

भाद्रपद

भास्कर

भसाडा

**म**

मज्जा

मध्ययुगीन

**य**

व्यक्तिमत्त्व

व्यायाम

यज्ञकुंड

**र**

राष्ट्रगीत

राष्ट्रवीर

रौप्य

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**ल**

लचक

**व**

वृक्ष

वायुपुत्र

वीर

वंदावे

विसर्ग

**श**

शास्त्रज्ञ

शिल्पकला

शिस्त

शब्दार्थ

शहामृग

**स**

सशस्त्र

संक्रांत

सुप्रभात

संहार

संगणक

सुवर्णपदक

संस्था

साहित्य

स्मारके

सातत्य

सुबकता

स्वरूप

सुवर्ण

सार्थक

सृजनशीलता

समर्थ

सौभाग्य

**ह**

हॉकी

हर्ष

**क्ष**

क्षमा

क्षमता

क्षणभर

**ज्ञ**

ज्ञान

ज्ञानेश्वर

**श्र**

श्रम

श्रीमंत

श्रद्धा

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED